**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

## विद्यापीठात कुलगुरूंच्या हस्ते ध्वजारोहण
## भारतीय स्वातंत्र्य दिन संपन्न

अमरावती -

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात भारतीय स्वातंत्र्याचा ७१ वा वर्धापनदिन मोठ्या उत्साहात साजरा झाला. कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांनी यावेळी ध्वजारोहण केले. याप्रसंगी प्र-कुलगुरु डॉ. राजेश जयपुरकर, कुलसचिव डॉ. अजय देशमुख, विद्यापीठ प्राधिकारिणींचे सदस्य, विविध शैक्षणिक व प्रशासकीय विभागांचे विभागप्रमुख, अधिकारी, शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मार्गदर्शन करतांना कुलगुरु म्हणाले, भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी अनेक स्वातंत्र्यसैनिक व महापुरुषांनी त्याग व बलिदान दिले. त्यांचे स्मरण व्हावे, म्हणून दरवर्षी आपण स्वातंत्र्यदिन साजरा करतो. ज्या महापुरुषांमुळे आजचा दिवस उजाडला, आम्हाला जीवन जगण्याची दिशा दिली, त्या महापुरुषांच्या कार्यापासून प्रेरणा मिळावी, यासाठी आजचा दिवस महत्वाचा आहे. महापुरुषांच्या दृष्टीने भारताला स्वातंत्र्य मिळवणे हे अंतीम साध्य असले तरी, देशाच्यादृष्टीने ते अंतीम साध्य नव्हते. एकाअर्थाने देशाच्या अखंडित आयुष्यामध्ये ते साधन होते व आहे. सर्व स्वातंत्र्यसैनिक व महापुरुषांच्या कार्याची श्रृंखला आणि चळवळीने हा देश घडत गेला. स्वातंत्र्यसंग्रामामध्ये क्रांतीकारकांनी अगदी तरुण वयात उडी घेतली आणि स्वातंत्र्याची ज्योत प्रज्वलित ठेवली.

हा देश माझा आहे, असे म्हणत हे सर्व महापुरुष जीवन जगलेत. भारतावर अनेक संकटे आलीत; पण अख्ख्या देशाने त्या संकटांचा सामना केला. सामुहिक देशभक्ती या देशात आहे आणि त्याचे आम्ही वारसदार आहोत. आलेल्या संकटांवर मात करीत पुढे जगण्याची मानसिकता आमची आहे. सामुहिक देशभक्तीची मानसिकता डोळ्यासमोर ठेवून आपण सर्वांनी कार्य केल्यास त्याचा निश्चितच आनंद महापुरुषांना होईल व तसा संकल्प आपण करावा, असे आवाहन करुन कुलगुरुंनी स्वातंत्र्यदिनाच्या सर्वांना शुभेच्छा दिल्यात. कार्यक्रमाचे संचालन क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाचे संचालक डॉ. अविनाश असनारे यांनी केले.

---

प्रति,
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दै............................. अमरावती.

**जनसंपर्क विभाग**
दि. १६/०८/२०१८.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी